REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ☆ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ५ जुलै, १९४४ अंक २७

वधूं नका अंत भगवंता !
जेव्हां सत्याचा लोप झाला !
'न्याया'स धाब्यावर बसविलें, 'माणुसकी'ची भरचौकांत होळी पेटली,
खुनी पेशवा गादीवर बसूं लागला, तेव्हां रामशास्त्र्यांच्या
पत्नीनें केलेला हा "धांवा" स्वर्गाची कवाडे फोडून
"देवा"च्या कानांवर गेला ! खुनास वाचा फुटली !!



शुक्रवारपासून सुरू झाला ) प्रभात ( किंवा लक्ष्मी थिएटर पुणें ( शुक्रवारपासून सुरू झाला

प्रभातचा प्रचंड प्रेक्षणीय ऐतिहासिक बोलपट

—रामशास्त्री—

निर्मातेः—दामले-फत्तेलाल | दिग्दर्शकः—गजानन जहागीरदार

—: भूमिका :—
गजानन जहागीरदार, मीनाक्षी, ललिता पवार, गणपतराव,
मा. विठ्ठल, सुधा आपटे, अनंत मराठे, हंसा,
भागवत, मांजरेकर, मा. छोटु

दररोज तीन खेळ
पैकीं पहिला खेळ दु. ३। वा.
हिंदी बोलपट
व
नंतरचे दोन्ही खेळ
सायंकाळीं ६॥ व रात्रौ १०
वाजताचे
मराठी बोलपट

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779




TELEGRAM Guest House Poona 2.

## विविध माहिती

### म्हैसूर संस्थानांतील रेल्वेजचें उत्पन्न

म्हैसूर संस्थानांतील सरकारी रेल्वेजमध्यें ६ कोटि, ९७ लक्ष रुपये भांडवल गुंतलेलें आहे. रेल्वेजकडून म्हैसूर सरकारास ४६½ लक्ष रुपये निव्वळ उत्पन्न मिळालें, म्हणजे गुंतलेल्या भांडवलावर ६·९३% व्याज सुटलें.

### म्हशींच्या कत्तलीवर निर्बंध

मुंबई प्रांतांतील कत्तलखान्यांत दर आठवड्यास किती म्हशी मारल्या जाव्यात, ह्याची कमाल संख्या सरकारनें ठरविली आहे. बांद्रा १९०, कुर्ला १६६, अहमदाबाद १५५, मालेगांव ९०, अशा म्हशी तेथील कत्तलखान्यांत मारण्यास परवानगी आहे.

### लष्करी गाड्यांमुळें होणारे अपघात

मुंबई शहरांतील ट्रॅम्स व बसेस ह्यांवर दररोज सरासरी तीन लष्करी गाड्या आदळून अपघात करतात, असा गेल्या तीन महिन्यांचा अनुभव आहे. ट्रॅम्सच्या मागून येऊन पुढें जाण्याचा प्रयत्न करणें, रस्त्याच्याकडे उभीं असलेलीं वहानें व ट्रामगाड्या ह्यांचेमध्यें आपली गाडी घालणें, चुकीनें दुसऱ्याच गिअरमध्यें गाडी टाकून ट्रॅम किंवा बसवर आदळणें, इत्यादि अपघातांचीं ठराविक कारणें आहेत. एक दुमजली बस नुकतीच अपघातांत सापडली, ती दुरुस्त होण्यास दोन महिने लागतील. त्या बसमधून दररोज एक हजार उतारूंचा प्रवास होत असे, म्हणजे वहातुकीच्या इतर साधनांवर इतका ताण सतत दोन महिने पडणार, असा अर्थ झाला.

### प्रीमिअर मोटर्स लि.

मोटारींच्या उत्पादनासाठीं वरील नांवाची १० कोटि रुपये अधिकृत भांडवलाची लिमिटेड कंपनी उभारण्यांत येत आहे, तिच्या डायरेक्टर बोर्डाचे शेठ वालचंद हिराचंद हे अध्यक्ष रहातील. श्री. तुळशीदास किलाचंद, श्री. धरमसी एम. खटाव, श्री. प्राणलाल देवकरण नानजी, सर धनजीशहा कूपर व श्री. लालचंद हिराचंद ही मंडळी बोर्डांत आहेत. तूर्त २½ कोटि रुपयांचे भाग विक्रीस निघतील, ते सर्व देवकरण नानजी इन्व्हेस्टमेंट कं. लि. नें अंडरराइट केले आहेत.

### दुभत्या जनावरांची शिरगणती

जनावरांस लागणारी वैरण, भुसा, सरकी, इत्यादींच्या रेशनिंगसाठीं मुंबई शहर आणि उपनगर ह्यांतील दुभत्या जनावरांची शिरगणती करण्याचें काम २१ जून रोजीं सुरू झालें.

### ओरिएंटल विमा कं. लि.

ओरिएंटल विमा कंपनीनें १९४३ सालीं १५ कोटि रुपयांचें काम पुरें केलें. १९४२ चे मानानें हा आकडा ५½ कोटींनीं मोठा आहे. प्रत्येक पॉलिसीची सरासरी रकम २,५९१ रुपयांची २,५८७ रुपये झाली. मृत्यूमुळें ७७ लक्ष रुपयांचे क्लेम आले. कंपनीच्या पैशावर ३·६८% (मुळांत प्राप्तीवरील कर कापून) व्याज सुटलें. नवीन गुंतवणुकीवर एवढें व्याज सुटणार नसल्याकारणानें कंपनीनें १ जुलैपासून आपल्या हप्त्यांचे दरांत थोडा बदल केला आहे. डिव्हिडंडचा दर (६२½%) कायम आहे.

### 'बँक ऑफ बरोडा'ची नवी शाखा

जळगांव येथें बँक ऑफ बरोडानें आपली एक शाखा उघडली आहे.

### हिंदी घटना कायद्यांत दुरुस्त्या

१९३५ च्या हिंदी घटना कायद्यांत कांहीं किरकोळ दुरुस्त्या करणारें एक बिल लॉर्डांच्या सभेंत मांडण्यांत आलें आहे. हायकोर्टांच्या तज्ज्ञांची सेवानिवृत्ति व एका हायकोर्टांतून दुसऱ्या हायकोर्टांत बदली ह्या संबंधांतील कायद्यांत सुधारणा करण्यांत यावयाची आहे. भारतमंत्र्याच्या सल्लागारांची सध्यांची संख्या आहे ती कमी करण्यांत यावयाची आहे. व्हाइसरॉय व सर सेनापति हे सध्याच्या कायद्याप्रमाणें पांच वर्षांतून एकदा इंग्लंडला रजेवर जाऊं शकतात, ते ह्यापुढें अधिक वेळा जाऊं शकतील.

### जर्मनीच्या पूर्ण पाडावास अद्याप अवधि आहे.

जर्मनी अति प्रबळ असून त्याचा पूर्ण पाडाव घडवून आणण्यास बराच काळ लागेल, असें आपलें वैयक्तिक मत असल्याचें कॅप्टन बाल्फर, अंडर सेक्रेटरी फॉर एअर, ह्यांनीं कॉमन्स सभेंत नुकतेंच सांगितलें.

### मुंबई प्रांताचे बाहेर कागद पाठविण्यास बंदी

हिंदुस्थान सरकारनें देशांतील प्रत्येक भागासाठीं कागदाचा वाटा ठरवून दिला असला तरी मुंबई प्रांतांतून बऱ्याच मोठ्या प्रमाणावर बाहेर कागद निर्गत होतो असें आढळून आल्यावरून, अशा निर्गतीस बंदी करणारा हुकूम मुंबई सरकारनें काढला आहे.

### श्री. कस्तुरबा स्मारक फंड

श्री. कस्तुरबा स्मारक फंडासाठी २ ऑक्टोबरपर्यंत ७५ लक्ष रुपये जमविण्याचें योजिलेलें आहे, त्यांपैकीं आतांपर्यंत २० लक्ष रुपये जमा झाले आहेत.

### आनंद येथें नवें शेतकी कॉलेज

आनंद (गुजरात) येथें एक शेतकी कॉलेज स्थापन करण्याकरितां शेठ मफतलाल गगलभाई ह्यांनीं श्री. के. एम. मुनशी ह्यांस ५ लक्ष रुपये देऊ केले आहेत. मुंबई सरकारचें त्यास सहाय लागेलच व त्यासंबंधांत प्रयत्न चालू आहेत.

### रशियामधील रक्तदानाची व्यवस्था

रशियामध्यें सैनिकांसाठी रक्तदान करणारांत ९५% स्त्रियाच असतात. ह्या रक्ताच्या कुपीवर तें देणारींचें नांव लिहिलेलें असतें त्यामुळें ज्या सैनिकास तें रक्त दिलें जातें, त्यास आपणांस पुनर्जन्म कोणी दिला, हें कळतें. अर्थातच, त्या दोघांमध्यें प्रेमसंबंध निर्माण होतो व त्यास सगळीकडे प्रसिद्धी दिली जाते व अशा रीतीनें रक्तदानाचा प्रचार करण्यांत येतो. रक्तांतरानें बरा झालेला सैनिक पुन: जखमी झाला, तर तो पूर्वींच्याच मुलीचें रक्त मागतो. रशियामध्यें रक्तदानाची व्यवस्था फारच उत्तम प्रकारची आहे. प्रत्येक केंद्रांत दररोज ८०० लोकांचें रक्त जमा करण्यांत येतें. रक्तदानाच्या मुख्य खात्याचीं ७९ केंद्रें व १,५०० उपकेंद्रें आहेत.

### डिफेन्स कर्जरोखे घेऊन युद्ध प्रयत्नास मदत

"हुंड्यांच्या व्यवहारास उत्तेजन देणारी डिस्कौंट बँक ऑफ इंडिया ही पहिलीच सिंधी बँक आहे. हैद्राबाद शाखेकडील १३ लाखांच्या ठेवींपैकीं १० लक्ष रुपये तिनें डिफ़ेन्स बॉण्ड्समध्यें गुंतविले आहेत व चालू वर्षांतील नव्या सिंधी शाखांमार्फत आणखी ५० लक्ष रुपये असेच गुंतविण्याची बँकेची अपेक्षा आहे. अशा रीतीनें बँक युद्धप्रयत्नास मदत करीत आहे."–डिस्कौंट बँक ऑफ इंडियाच्या हैद्राबाद शाखेच्या उद्घाटनप्रसंगीं बँकेच्या मॅनेजिंग डायरेक्टरांनीं वरील प्रकारचे उद्गार काढले.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २१० |
| २ हिंदी विमा व्यवसाय... | २११ |
| ३ शेअर बाजार ... | २१२ |
| ४ स्फुट विचार .. ... | २१३ |
| अखिल भारतीय कृषिमंडळ—दुष्काळाची पुनरावृत्ति अशक्य करा—शेती सुधारणा—लॉर्ड वेव्हल ह्यांची सूचना—गिरण्यांच्या उत्पादनाचा यंत्रांवर परिणाम. | |
| ५ वेस्टर्न इंडिया विमा कं. | २१४ |
| ६ सह्याद्रि विमा कं. ... | २१४ |
| ७ ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कंपनी ... ... | २१४ |
| ८ रेल्वेजवरील लाचलुचपती-च्या प्रकारांस आळा | २१५ |



# अर्थ

बुधवार, ता. ५ जुलै, १९४४


## हिंदी विमा व्यवसाय

हिंदुस्थान सरकारचें १९४३ चें विमा वार्षिक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे, त्यांत हिंदुस्थानांतील १९४२ सालांतील विमा व्यवसायाची माहिती देण्यांत आली आहे. बहुतेक सर्व आयुर्विमा कंपन्यांना सध्या वाढतें काम मिळत आहे, त्याचें प्रतिबिंब ह्या वार्षिकांत दिलेल्या आंकड्यांतहि आढळतें, १९४१ सालीं १४ कोटि, ५३ लक्ष रुपये हप्ते देणारे २९१¾ कोटि रुपयांचे १५,९२,००० विमे चालू होते; १९४२ अखेर चालू विम्यांची संख्या १६,६१,००० वर गेली व त्यांची एकूण किंमत ३२३ कोटि रुपये भरली. त्यांच्या वार्षिक हप्त्यांची बेरीज १६ कोटि, ६ लक्ष रुपये होती. १९४१ चे मानानें १९४२ सालीं नव्या कामांत ३ कोटींची वाढ होऊन तें ४२ कोटि, ८३ लक्ष रुपये झालें. त्यापैकीं हिंदी आयुर्विमा कंपन्यांच्या वांटणीस ३७ कोटि, ८९ लक्ष रुपयांचें काम आलें; १९४१ सालीं त्यांचा वाटा ३६ कोटि ६८ लक्ष रुपये इतका होता. म्हणजे, झालेल्या वाढींत विदेशी कंपन्यांनाच अप्रमाणबद्ध हिस्सा मिळालेला आहे.

१९४२ अखेर विमा खातीं फंड ७ कोटि, १५ लक्ष रुपयांनीं वाढून तो ७५ कोटि, ९४ लक्ष रुपये झाला. मुळांत वजा केलेला प्राप्तिवरील कर सोडला तर ह्या फंडावर सरासरीनें ३·९४% व्याज सुटलें. १९४१ सालीं ४·७५% व्याज सुटलें होतें. १९४३ सालासंबंधीं कित्येक प्रमुख कंपन्यांचे ताजे अहवाल पहातां व्याजाचा हा दर आणखी खालीं जात चालला असल्याचें स्पष्ट दिसतें. तथापि, व्यवस्थेचा खर्च उतरत चाललेला आढळतो. १९४१ चे मानानें १९४२ सालीं तो ०·७% नें उतरून २६·७% झाला. १९४२ सालांतील नव्या कामाची वाटणी खालीलप्रमाणें होती :—

| | | एकूण काम (रु.) | वार्षिक हप्ते (रु.) |
|---|---|---|---|
| हिंदी कंपन्या | १९४१— | ३४ कोटि १४ लक्ष | १ कोटि ७७ लक्ष |
| | १९४२— | ३६ कोटि ४७ लक्ष | १ कोटि ९१ लक्ष |
| विदेशी कंपन्या | १९४१— | ५ कोटि ३७ लक्ष | ३३ लक्ष |
| | १९४२— | ६ कोटि ३६ लक्ष | ३१ लक्ष |
| एकूण | १९४१— | ३९ कोटि ५१ लक्ष | २ कोटि १० लक्ष |
| | १९४२— | ४२ कोटि ८३ लक्ष | २ कोटि २२ लक्ष |

विमा वार्षिकांत नव्या आयुर्विमा कंपन्या स्थापन करणारांस पुनः एकवार धोक्याचा इषारा देण्यांत आला आहे. अमेरिकेंत दर माणशीं विम्याची रकम एवढी प्रचंड आहे, इंग्लंडमध्यें ती इतकी मोठी आहे, परंतु हिंदुस्थानांत ती अत्यल्प आहे म्हणून ह्या देशांत नव्या विमा कंपन्यांच्या स्थापनेस पुष्कळ वाव आहे अशा अर्थाचें समर्थन कंपन्यांचे उत्पादक करीत असतात; परंतु दर माणशी उत्पन्नाचे तुलनात्मक आकडे मात्र ते लक्षांत घेत नाहींत. लोकांच्या आर्थिक परिस्थितींत बरीच सुधारणा झाल्याविना हिंदुस्थानांतील विम्याचें काम फारशी वाढ दाखवूं शकणार नाहीं, हें सर्वांनीं लक्षांत ठेवावें, असें सरकारी ॲक्चुअरी म्हणतात. युद्धसमाप्तिनंतर हिंदुस्थानांत औद्योगिक प्रगतीस जोराची चालना मिळून लोकांची ऐपत वाढेल, ह्या युक्तिवादास त्यांचें उत्तर असें आहे कीं, औद्योगिक प्रगति व लोकांच्या मिळकतींत वाढ हीं दोन्हीं बरोबरीनें जात नाहींत. त्यामध्यें बऱ्याच वर्षांची तफावत पडते असा अर्थशास्त्राचा सिद्धांत आहे. म्हणजे आज उद्योगधंदे ऊर्जितावस्थेस आले तरी, त्याचें लोकांच्या आर्थिक परिस्थितींत प्रतिबिंब दिसूं लागण्यास कित्येक वर्षें लोटावीं लागतात. “युद्धानंतर अपेक्षित भरभराट अनुभवास आली नाहीं, तर विमा कंपन्यांना आपल्या अस्तित्वासाठी परस्पर स्पर्धा करावी लागेल व ज्या कंपन्या आज कशाबशा तोटा टाळूं शकत आहेत त्या बंद पडण्याचा प्रसंग येईल” असें सरकारी ॲक्युअरीचें स्पष्ट म्हणणें आहे.

हिंदी आयुर्विम्याच्या व्यवसायाविषयीं सरकारी ॲक्युअरीनें काढलेले हे उद्गार विमा कंपन्यांच्या चालकांनीं लक्षांत ठेवले पाहिजेत. उतरलेला व्याजाचा दर आणि सरकारी रोख्यांतील, सक्तीच्या गुंतवणुकीचें भारी प्रमाण ह्यांचे कचाट्यांत लहान व मध्यम आकाराच्या कंपन्या सापडल्या. त्यांतून तगून बाहेर पडणाऱ्या कंपन्यांस सरकारी ॲक्युअरीच्या इशाऱ्याची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. तथापि, कांहीं कंपन्यांची दुःस्थिति इतर कंपन्यांवरहि दुष्परिणाम करते व व्यवसायाचा दर्जा खालीं आणते, ह्या दृष्टीनें प्रत्येक कंपनीसच सावधगिरीनें वागणें आवश्यक आहे. कांहीं कंपन्यांचे चालक नवीन भांडवल उभारून आपली चंगळ दीर्घ काळ टिकविण्याचा प्रयत्न करतात. नवीन भांडवलाची उभारणी केवळ चालकांच्या हिताची असून सामान्य जनतेचें त्यांत नुकसान आहे असें सरकारी ॲक्चुअरीचें मत झालें तर तो नव्या भांडवल उभारणीस पाठिंबा देणार नाहीं, असें त्यानें स्पष्ट म्हटलें आहे.

### गिरण्यांच्या सुटीचे दिवस

विजेच्या पुरवठ्यावर पडणारा ताण नियंत्रित करण्याच्या उद्देशानें मुंबई शहर व उपनगर ह्यांतील सर्व गिरण्या एकाच दिवशीं बंद ठेवण्यांत येऊं नयेत; त्यांच्या सुटीचे दिवस वेगवेगळे असावेत, असें मुंबई सरकारनें योजिलें होतें. हा उपक्रम यशस्वी ठरला व सरकारनें १९४४ अखेर ती योजना चालू ठेवण्याचें आतां ठरविलें आहे.

## शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम.)

मागील दोन तीन दिवसांच्या हालचाली पाहतां बाजार खालच्या भावांत स्थिरावत चालला आहे असें दिसून येईल. आठवड्यांत डाईंग १८५० वरून शुक्रवारीं १८८८-१२, कोहिनूर खालीत खाली ५९२ वरून ६०६, सिंधुस्स २४० वरून ३४९, स्वान ३१० वरून ३२४, स्वदेशी ५२२ वरून ५३८ मॉडेल २६३ वरून २७५ व विशेष नजरेंत भरेल अशा रीतीनें मोरारजी ६०५ वरून ६८५ असे गिरण्यांचे भाव आहेत. ब्रह्मदेशांतील प्रगतिमुळें बर्मा ४१० वरून ४१५, बर्मा कॉर्पोरेशन ४–८, बी. बी. पेट्रोल १-६-६ असे मजबूत असून इतर विभागांतील टाटा केमिकल २६-२ वरून २९-८, टाटा ऑर्डिनरी ४१५-८ व डिफर्ड २१५२–८ व इंडियन आयर्न १८-९ असे स्थिर आहेत. टाटांचें व्याज अजून गुलदस्तांतच असून बाजारांत 'जेटला माणस तेटली वातो' असा प्रकार आहे. जाणते लोक असें धरून चालत आहेत कीं मजूरवर्ग संतुष्ट राखण्याकरतां त्यांना प्रमाणापेक्षां जास्त बक्षिशी वाटण्यांत येऊन त्याचा परिणाम व्याज कमी करण्यांत, मागील वर्षापेक्षा नफा वाढलेला असला तरी, अथवा जेमतेम आसपास कायम राखण्यांत व्हावा. या दृष्टीनें टाटा महाग वाटतात. कारण विचारी पैसे राखणारे डिफर्ड ऐनजिनशी २००० च्या आसपास पडावा असें पहात असतात व सध्याच्या भावांत तो तसा पडणार नाहीं. विर्ल्र मोटर व वालचंद शेटजींच्या प्रीमिअर मोटर कं. ना भराभर अर्ज जात असून आतांच त्यांचे वायदे सुरू झाले असून दोन्हींवर अनुक्रमे १ रु. व ४ रु. नजराणा सुरू झाला आहे. पहिल्याचे कमींत कमी शंभर अर्जांसोबत प्र. रु. २१८ व दुसऱ्याचे प्र. पाचाबरोबर प्र. रु. १० देणेचे आहे. पुण्यांत अर्ज नमुने मिळण्याची सोय आहे असें कळतें.

अलीकडे स्थानिक कंपन्यांच्या शेअरकडे मंडळींचें लक्ष जात असून त्यांच्या भावांबद्दल पुष्कळदां विचारणा होते. महाराष्ट्राच्या स्वतःच्या शेअरबाजाराच्या अभावीं निश्चित भाव मिळणें कठीण आहे व किरकोळ गांवांत सौदे होतात व कानी येतात त्यावरूनच अनुमान बांधावें लागतें. किर्लोस्कर ५५, ओगले ६३, असून महाराष्ट्र बँक ३० पर्यंत मागितले जात आहेत. कॉमनवेल्थ विमा ५० पर्यंत खपूं शकत असून, सेंट्रल को. बँक ५०–५२ पर्यंत घेतले जातात. स्थानिक बस कंपनींचे शेअर फक्त कंपनी काढणारांच्याच हातांत आहेत व ते कदापि बाहेर येतील असें वाटत नाहीं.

### पंजाब सरकारची प्रचंड धरणाची योजना

जम्मू संस्थानाचे हद्दींत चिनाब नदीवर एक प्रचंड धरण बांधण्याची पंजाब सरकारची योजना आहे. ह्या धरणामुळें साठगारें पाणी ४० मैल आंतपर्यंत जाईल, धरणाच्या पाण्यावर निर्माण होणाऱ्या विजेचा उपयोग आजूबाजूच्या धातूंच्या खाणींच्या उत्पादनाकडे किफायतशीर होऊं शकेल.


# आणखी एक टप्पा

१९४३ मधील नवीन काम एक कोटिहून अधिक

खर्चाचें प्रमाण तरीहि नेहमींप्रमाणेंच कमी

रद्द होणाऱ्या विम्याचें प्रमाणहि सर्व देशांत कमी

मोठाच गहिरा पुरावा–

(अ) एजंटांच्या बहारीच्या कामगिरीबद्दल व

(ब) विमेदारांच्या कंपनीवरील आदरणीय विश्वासाबद्दल

**वेस्टर्न इंडिया विमा कंपनी, लि.**

मुख्य कचेरी सातारा

पुणें शाखा : कर्वे बिल्डिंग लक्ष्मीरोड.

# स्फुट विचार

## अखिल भारतीय कृषिमंडळ

शेतीशीं संबंध असलेल्या कित्येक हिंदी धंद्यांचें नियमन करून त्यांत सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशानें निरनिराळीं प्रातिनिधिक मध्यवर्ती मंडळें स्थापण्यांत आलीं आहेत. कपास, ताग, चहा ह्यांचे संबंधांत मंडळें आहेत, तसेंच एक मंडळ ऊस, गूळ व साखर ह्यांचे बाबतींत स्थापन केलें जात आहे. उत्पादन, विक्री व किंमती ह्यांचें नियमन करण्याच्या हेतूनें धंद्यांच्या प्रगतीविषयींचें धोरण ठरवणें हें ह्या मंडळांचें मुख्य कार्य असतें. सबंद शेतीच्या धंद्यांत सुधारणा विविध रीतींनीं व्हाव्या ह्यासाठी इंपीरिअल कौंसिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ही हिंदुस्थान सरकारच्या आश्रयानें काम करणारी मोठी मध्यवर्ती संस्था आहेच. तथापि, हिंदी पिकांचें उत्पादन वाढवण्याकरितां योजना आखल्या जात आहेत, त्यांच्यामध्यें निरनिराळ्या प्रांतांच्या संबंधांत एकसूत्री व मेळाचें धोरण अमलांत येणें अगत्याचें असल्यानें अखिल भारतीय शेतीमंडळ स्थापण्याचें निश्चित झालें आहे असें समजतें. सबंद हिंदुस्थानांत मिळून कोणतीं पिकें करणें इष्ट आहे आणि प्रांताप्रांतांतून तीं कोणत्या प्रमाणांत केलीं जावीं ह्याचा अंदाज बांधून प्रत्येक प्रांत, जिल्हा, तालुका व खेडेगाव ह्यांचेमध्यें त्यांची वाटणी व्हावी अशी कल्पना आहे. ह्या कामासाठी प्रत्येक प्रांतांत एक समिति असावी आणि प्रत्येक ज़िल्ह्यासाठीहि उपसमिति स्थापन व्हावी अशीहि सूचना करण्यांत आली आहे. स्वदेशी धंदे आणि निर्गत व्यापार ह्यांच्या गरजाहि उत्पादनाच्या योजना तयार करतांना हिशेबांत घेण्यांत येणार आहेत. हें सर्व कार्य बरेंच गुंतागुंतीचें आणि अवघड आहे ह्यांत शंका नाहीं. कारण पिकांचें उत्पादन वाढवतांना त्यांच्या किंमती शेतकऱ्यांस फायदेशीर होतील ह्याविषयीं खबरदारी घेतली जाणें अगत्याचें आहे, एवढेंच नव्हे तर शेतीच्या विस्तारास लागणाऱ्या भांडवलाचा पुरवठा होण्याची तरतूद करावी लागेल. ह्या प्रश्नाच्या महत्त्वाचे दृष्टीनें शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा आणि त्यांस व्हावयाच्या अल्प व दीर्घ मुदतीच्या भांडवलाचा पुरवठा ह्या बाबींचा विचार करण्यासाठी एक उपसमिति नेमण्यांत आली आहे आणि तिनें आपल्या शिफारसी तीन महिन्यांचे आंत करावयाच्या आहेत. भिन्न भिन्न प्रांतिक परिस्थिति आणि विषयांचा विस्तार हीं लक्षांत घेतां ही उपसमिति काय सूचना करते तें पहावें.

---

## दुष्काळाची पुनरावृत्ति अशक्य करा

बंगाल आणि हिंदुस्थानचे कांहीं इतर भाग ह्यांचेमध्यें पडलेल्या दुष्काळानें आणि त्यानें घेतलेल्या लक्षावधी बळींनीं लोकांच्या मनास एवढा मोठा धक्का दिला आहे कीं असल्या आपत्तीची पुनरावृत्ति होऊं नये ह्याविषयीं खबरदारी घेण्याची अगत्याची सूचना ब्रिटिश व हिंदुस्थान सरकारास करण्याची आवश्यकता देशांतील पुढाऱ्यांस भासली आहे. उद्योगधंदे व दुसरीं कार्यक्षेत्रें ह्यांत वावरणाऱ्या सत्तावीस हिंदी पुढाऱ्यांनीं एक पत्रक प्रसिद्ध केलें आहे आणि त्यांत हिंदुस्थानास योग्य धान्यपुरवठा केला जाण्याचें अगत्य प्रतिपादलें आहे. अन्नपुरवठ्याविषयीं धोरण ठरवण्यासाठी नेमलेल्या ग्रेगरी कमिटीच्या शिफारसींस अनुसरून सरकारनें धान्य आयात करून त्याची वाटणी जरूरीप्रमाणें करावी आणि अन्नाचा तुटवडा पडणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी ह्या आशयाची मुख्य सूचना त्या पत्रकांत आहे. येथील धान्यपुरवठ्याची परिस्थिति समाधानकारक आहे असें म्हणतां येणार नाहीं आणि पाउसपाणी अनिश्चित असून त्यांत थोडी कमतरता पडल्यास दुष्काळ आपलें डोकें वर उचलील, ह्यासाठी ब्रिटिश सरकारनें ह्या देशांत धान्य बाहेरून आणण्याची व्यवस्था करावी असें पत्रकांत सुचवलें आहे. धान्याची आयात झाल्यावांचून हिंदुस्थानांतील उत्पादन लोकांच्या गरजांस पुरें होणार नाहीं ही गोष्ट स्पष्ट असतां त्यासंबंधांत अजून प्रयत्न झाले नाहींत ह्याकडे ब्रिटिश पार्लमेंट व जनता आणि अमेरिका ह्यांचें लक्ष हिंदी पुढाऱ्यांनीं वेधलें आहे आणि ब्रिटिश सरकारवर त्यांनीं आपलें नैतिक वजन पाडावें असें त्यांनीं म्हटलें आहे. युद्धपरिस्थितिजन्य वहातुकीच्या अडचणी असल्या तरी युद्धप्रयत्नांत हिंदुस्थानचें स्थान अत्यंत महत्त्वाचें आहे हें ध्यानांत वागवून ब्रिटिश मंत्रिमंडळानें ह्या देशाच्या अन्नपुरवठ्याचा प्रश्न सोडवण्याची शिकस्त केली पाहिजे असें हिंदी पुढाऱ्यांचें सांगणें आहे आणि त्याचा ब्रिटिश सरकारावर योग्य तो परिणाम वेळींच होईल अशी आशा आहे.

---

## शेती सुधारणा—लॉर्ड वेव्हल ह्यांची सूचना

युद्धोत्तर काळांतील हिंदी शेतीच्या पुनर्घटनेविषयींच्या योजनेची चर्चा ह्या संबंधांतील धोरण निश्चित करण्यासाठी नेमण्यांत आलेल्या समितीच्या सभेंत दिल्ली येथें नुकतीच झाली आणि तीमध्यें मूलभूत स्वरूपाचे कित्येक ठराव मान्य करण्यांत आले. ह्या बाबतींत मध्यवर्ती कार्यकारी मंडळाचे सभासद सर जोगेंद्रसिंग ह्यांनीं विस्तृत भाषण करून शेतीच्या सुधारणेचे उद्देश व कार्यक्रम ह्यांचें वर्णन केलें. त्यांचे विचार आणि समितीचे ठराव ह्यांचा मथितार्थ आतां सामान्यतः लोकांच्या परिचयाचा झाला आहे आणि त्यांमध्यें कांहीं नवीन व मुद्यांचें होतें असें दिसत नाहीं. हिंदी जनतेस भरपूर सकस अन्न खावयास मिळावें, तिची रहाणी उच्च दर्जाची व्हावी, शेतकरीवर्गाची प्राप्ती वाढावी, जमीन अधिक उत्पादक बनावी आणि तिच्यांत धान्यें व आवश्यक असा कच्चा माल मोठ्या प्रमाणांत तयार व्हावा, जनावरांची पैदास व निगा चांगली रहावी इत्यादि उद्देश सर्वमान्य आहेत. ते साध्य होण्यास मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकार कोणते प्रयत्न करणार आणि ते केव्हां चालू होणार हें जाणण्याची उत्कंठा लोकांस लागली आहे. ह्या दृष्टीनें व्हाइसरॉय, लॉर्ड वेव्हल, ह्यांनीं उपरिनिर्दिष्ट सभेस पाठवलेल्या संदेशांतील एक सूचना विशेष व्यावहारिक व महत्त्वाची आहे. युद्धोत्तर पुनर्घटनेची योजना ठीक आहे, पण तिच्या कार्यक्रमापैकीं कांहीं भाग युद्धकाळांत हातीं घेतला जाण्याचें अगत्य त्यांनीं प्रतिपादलें. सध्या खाद्य पदार्थांचें उत्पादन वाढवण्याचें अगत्य तीव्रतेनें भासत आहे. अशा वेळीं मोठ्या योजना, तज्ज्ञ व शिकलेल्या लोकांचा पुरवठा अशा साधनांच्या तयारीची वाट न पहातां शक्य व उपलब्ध असलेल्या सामुग्रीचा अधिकांत अधिक उपयोग करून घेणें सयुक्तिक आहे. होतकरू व उत्साही तरुण शेतकऱ्यांस कामचलाऊ शिक्षण देऊन त्यांच्याकडून धान्य-पुरवठा वाढवण्याचे कार्यीं सहाय घेण्याची सूचना लॉर्ड वेव्हल ह्यांनीं केली आहे. तिची अंमलबजावणी प्रांतिक सरकारकडून कशी होते हें पहाणें आहे. अन

पुरवठ्याचा प्रश्न इतका जिव्हाळ्याचा आहे की तो सोडविण्यासाठीं शीघ्र फलदायी उपायांचा अवलंब केला जाणें आवश्यक आहे. अशा तऱ्हेच्या योजना मुंबई सरकार हातीं घेत आहे आणि व्हाइसरॉयांनीं सुचविल्याप्रमाणें काय करतां येईल ह्याचा विचार त्यांचेकडून होईल अशी अपेक्षा आहे.

---

### कापूस कापडाच्या गिरण्यांचें उत्पादन व त्याचा यंत्रांवरील परिणाम

हिंदुस्थानांतील कपास कापडाच्या व सुताच्या गिरण्यांची संख्या ४०१ आहे व त्यांत १ कोटि चात्या व २ लक्ष माग आहेत. प्रथम सुताच्या गिरण्याच ज्यास्त होत्या, परंतु बाहेरील बाजारपेठांतील खप कमी झाल्याकारणानें मागांची संख्या वाढूं लागली. १८८९ मध्यें गिरण्यांतील चात्या व माग ह्यांचें प्रमाण १९५:१ असें होतें. तें आतां ५०:१ असें झालें आहे. १९१९-२० मध्यें हिंदी गिरण्यांत ४० नंबरांच्या वरच्या सुताचें उत्पादन फक्त ४० लक्ष पौंड झालें; १९४० मध्यें तें ८ कोटि, ९० लक्ष पौंडांवर गेलें, कारण तत्सम कापडाचा खप वाढला व परदेशी कापडाशीं टक्कर देणें हिंदी गिरण्यांस क्रमप्राप्तच झालें. चालू युद्धविषयक मागणीमुळें सर्व गिरण्या पुनः कमी नंबराच्या सुताचें कापड काढूं लागल्या आहेत. १९३७ सालीं प्रत्येक चौरस वार कापडाचें सरासरी वजन ३·३ औंस होतें, तें आतां ४·०१ औंस भरूं लागलें आहे. गिरण्यांतील सुताचें उत्पादनहि, त्याच्या वजनाचा विचार करतां, ४०% वाढलें आहे. ह्या सर्व गोष्टींमुळें गिरण्यांतील यंत्रसामुग्रीवर कमालीचा ताण पडत आहे व शक्य तेवढ्या लवकर नवीं यंत्रें बसविणें आवश्यक होणार आहे. गेल्या महायुद्धापासून गिरण्यांची एकसारखी वाढ होत राहिली आहे परंतु त्या युद्धानंतर नवी यंत्रसामुग्री बनविली गेली नाहीं, कारण त्या युद्धाचा गिरण्यांवर आतां इतका ताण पडला नाहीं व यंत्रेंहि २० वर्षांचींच जुनीं असल्याकारणानें तीं बऱ्या स्थितींत होतीं. गिरण्यांतील सध्याच्या यंत्रसामुग्रीपैकीं बहुतेक यंत्रें ४० वर्षें काम देत आलीं आहेत व त्यांवर पडलेल्या कामाच्या ताणामुळें तीं युद्धानंतर किफायतशीर चालवितां येणार नाहींत. हिंदुस्थानांत यंत्रसामुग्री तयार होण्यास लागणारा सर्व कच्चा माल उपलब्ध असूनहि त्याचें उत्पादन अद्याप कोणीहि हातीं घेतलेलें नाहीं. ऑल इंडिया टेक्स्टाइल परिषदेच्या मुंबई येथील अधिवेशनांत वरील माहिती एका वक्त्यानें दिली.

---

### वेस्टर्न इंडिया विमा कंपनीनें एक कोटीची मर्यादा ओलांडली

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या १९४३ च्या अहवालांतील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिनें १९४३ सालीं १ कोटि, १४¾ लक्ष रुपयांचें काम पुरें केलें, ही होय. भरभक्कम आयुर्विमा निधि, पैशाची किफायतशीर गुंतवणूक, खर्चाचें अल्प प्रमाण, उत्कृष्ट बोनस, रद्द होणाऱ्या कामाचें लहान प्रमाण, मोठाले गुप्त रिझर्व्ह ठेवण्याचें सावधगिरीचें धोरण, काटकसरीच्या कामाची परंपरा, इत्यादि सर्व बाबतींत वेस्टर्न इंडिया कंपनी अग्रेसर असतांनाहि त्या मानानें नव्या कामाचा आकडा कांहीं मर्यादेपलीकडे गेला नव्हता. काम मिळविण्याची चोख पद्धति हेंच त्याचें कारण होतें. ही चोख पद्धति कायम राखूनच एक कोटि रुपयांची मर्यादा आतां कंपनीनें ओलांडून ह्याहि बाबतींत आपलें उच्च स्थान सिद्ध केलें आहे. कित्येक विमा कंपन्यांच्या ताज्या मूल्यमापनांत तोटाच दिसून आला, परंतु वेस्टर्न इंडियाच्या १९४२ अखेरच्या मूल्यमापनांत व्याजाचा दर ४% ऐवजी ३½% धरूनहि पुरेसा वाढावा उरला व विमेदारांना १० रु. व ८ रु. बोनस मिळाले, ह्यावरून कंपनीची सुस्थिति दिसून येते. कंपनीकडे नव्या कामाचा ओघ १९४३ च्या पेक्षाहि अधिक वेगानें येत असून १९४४ च्या पहिल्या सहामाहींत १९४३ च्या पहिल्या सहामाहीच्या मानानें ६५% अधिक काम कंपनीस मिळालें आहे.

---

### सह्याद्रि विमा कंपनी लि.

वरील कंपनीनें १९४३ सालीं १६¾ लक्ष रुपयांचें काम पुरें केलें. १९४२ सालीं १२ लक्ष रुपयांचें काम पुरें झालें होतें. विमा खातीं फंडांत एका वर्षांत १¾ लक्ष रुपयांची भर पडून तो २,४३,४२७ रुपये झाला आहे. सरासरी आयुर्विमानिधीवर व्याजाचा दर द. द. शे. ४·८ पडला. व खर्चाचें प्रमाण ११% नें कमी होऊन तें २८·५% वर आलें. आरंभापासून प्रचारकार्य, प्राथमिक खर्च, इत्यादींवर झालेल्या खर्चाची बाकी सुमारें १७ हजार रुपये १९४३ सालीं पूर्णपणें खर्ची घालण्यांत आली. कंपनीनें अहवालाचे वर्षीं बडोदें संस्थानांत कामास प्रारंभ केला. ह्या सर्व गोष्टींवरून कंपनीची प्रगति योग्य मार्गानें व चांगल्या तऱ्हेनें होत आहे, हें दिसून येतें. कंपनीच्या ताळेबंदांत देण्याचे बाजूस ९८,१९४ रु. भांडवल, २,४३,४२७ रु. विमाखाती फंड, १,१९,४११ कर्ज व ठेवी आणि जिंदगीचे बाजूस ९३,०१० रुपये मालमत्तेच्या तारणावर कर्जें, ७२,७६७ रुपये सोड किंमतींचे आंत विमापत्रकांवर कर्जें, २,७९,६१४ सरकारी रोखे, अशा प्रमुख बाबी आहेत. ३ जून रोजीं कंपनीची वार्षिक सभा झाली.

---

### ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.

वरील कंपनीची नववी साधारण सभा ता. २५ रोजीं कंपनीचे अध्यक्ष, श्री. सरदार जगन्नाथ महाराज, ह्यांचे अनुपस्थितींत बॅरिस्टर एन. एम. पटवर्धन ह्यांचे अध्यक्षत्वाखालीं भरली होती. कंपनीच्या अध्यक्षांचे छापील भाषणांत तिच्या प्रगतीचा आढावा घेण्यांत आला; तीवरून नवें काम, हप्त्यांचें उत्पन्न, विमा खातीं फंड, खर्चाचें प्रमाण, ह्या सर्व बाबतींत कंपनीची प्रगति होत असल्याचें दिसून येतें. रिन्युअल खर्चाचें प्रमाण १५% खालीं आणून तेथें तें स्थिरावण्याचा चालकांनीं निर्धार केला आहे. बजेटाबाहेर होणाऱ्या खर्चामुळें खर्चाचें प्रमाण १८% पेक्षा अधिक झालें, तर हा जादा खर्च डायरेक्टर व मॅनेजर आपल्या वेतनांतून भरून देणार आहेत. हप्त्यांचे दर वाढविणें इतर आयुर्विमा कंपन्याप्रमाणें ट्रस्ट ऑफ इंडियासहि, उतरत्या व्याजाच्या दरास तोंड देण्यासाठी अपरिहार्य झालें आहे. कंपनीनें आपल्या भागांचे सर्व कॉलचे पैसे मागवले आहेत व नवीन भागांची विक्री करतां यावी यासाठीं भांडवलवाढीची परवानगी कंपनीनें सरकारकडे मागितली आहे. आयुर्विम्यास आगीच्या विम्याच्या व्यवहाराची जोड देण्याचा चालकांचा विचार दिसतो. कंपनीचे डायरेक्टर—मॅनेजर श्री. देशमुख ह्यांच्या प्रयत्नांमुळें कंपनीचा दर्जा वाढत आहे व तिचा आर्थिक पाया अधिकाधिक मजबूत होत आहे.

## रेल्वेजवरील लाचलुचपतीच्या प्रकारांस आळा.

**रेल्वेजची दक्षता : जनतेच्या सहकार्याची आवश्यकता**

वरील विषयावर जी. आय. पी. व बी. बी. अँड सी. आय. रेल्वेजच्या अधिकाऱ्यांनीं खुलाशाचें एक पत्रक काढलें आहे, त्यांत "युद्ध परिस्थितीमध्यें इतर ठिकाणांप्रमाणें रेल्वेजवरहि लाचलुचपतीच्या वाढीची प्रवृत्ति निर्माण होणें अपरिहार्य आहे" अशी प्रारंभींच कबुली दिलेली आहे. पत्रक पुढें म्हणतें, "खोटेपणा आतां अर्थातच ज्यास्त फायदेशीर झाला आहे. नफेबाज व काळ्या बाजारांतील व्यापारी हे मोठमोठाली लालुच दाखवूं शकतात; शांततेच्या काळांत हें व्यवहार्य होत नाहीं. वाघिणींचा तुटवडा व उतारूंना अपुरी जागा, त्याचप्रमाणें अंमलांत असलेलीं वेगवेगळीं बंधनें हीं बेमुर्वत लोकांस लाचलुचपतीची संधी निर्माण करून देतात. हे प्रकार उघडकीस येण्याची भीति कमी झाली आहे, कारण देखरेखीचें मामुली काम करणारे लोक युद्ध-कार्यांत गुंतले आहेत किंवा आपल्या देशासाठीं लष्करांत दाखल झाले आहेत. कोर्टांत जाणें किंवा चौकशींत वेळ घालवणें सच्चा माणसांस परवडत नाहीं आणि विश्वासार्ह पुराव्याखेरीज कायदा गुन्हेगारांस शासन करूं शकत नाहीं. ह्या परिस्थितीवर उपाय योजण्याचा रेल्वेजनीं शक्य तो प्रयत्न केला आहे व त्या पुढेंहि करतील.

१९४३ अखेर १५० प्रकरणांची चौकशी करण्यांत आली, त्यांपैकीं ८२प्रकरणें कोर्टांत नेण्यांत आलीं. ४५ प्रकरणांत शिक्षा झाल्या व १४ आरोपी दोषमुक्त ठरले. ३३ प्रकरणांत कोर्टाकडे जाणें युक्त नव्हतें, परंतु त्यांची खात्यामार्फतच चौकशी करून १४ नोकरांना नोकरींतून खालीं करण्यांत आलें. लाचलुचपतीच्या प्रकारांची चौकशी करण्याकरितां एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याचे हाताखालीं अनुभवी रेल्वे नोकरांचा स्टाफ देण्यांत आला आहे व खटले चालविण्यासाठी दोन खास कोर्टें स्थापन करण्यांत आलीं आहेत. गैरमाहितीमुळें जनतेचें नुकसान होऊं नये, एवढ्या-साठीं वाघिणींची वांटणी, माल पाठविण्याची व्यवस्था, उतारूंची जागा रिझर्व्ह करण्याची पद्धत, इत्यादि विषयीं माहिती वर्तमानपत्रें व जाहीर नोटिसा ह्यांचे द्वारां प्रसृत केली जाते. अर्थात, जनतेकडून हार्दिक सहकार्य मिळाल्याविना हे प्रयत्न फलद्रायी होणार नाहींत. अब्रूदार व्यापारी व कारखानदार हे जरीं लाचलुचपतीच्या प्रकारांपासून अलिप्त राहिले, तरी युद्धपरिस्थितींत त्यांना तात्पुरते व कच्चे नोकर व दलाल नेमावे लागतात आणि ते ह्या प्रकारांचा अवलंब करण्यास तयार होतात. रेल्वे रिसीट, पार्सलाचें बिल, तिकीट, ह्यांवर लिहिलेल्या रकमेपेक्षा जास्त रकम कोणीहि देऊं नये; बेकायदा बक्षीस देणारा व घेणारा हे दोघेहि दोषी असतात. लाचलुचपतीचे प्रकार रेल्वे अधिकाऱ्यांच्या नजरेस आणल्यानें व्यापाऱ्यांच्या स्वतःच्या हितांचें संरक्षण होतेंच; ह्याखेरीज युद्धप्रयत्नांसहि त्याची मदत होते."

**दुसऱ्या आघाडीवरील सैनिक-हानि**

युरोपांत दुसरी आघाडी दोस्तांनीं ता. ६ जून रोजीं उघडली, तेव्हांपासून २० जून अखेर दोस्तांचे तेथें ४० हजार सैनिक कामास आले. त्यांतील अमेरिकनांची संख्या २४ हजार आहे. ह्याच मुद्-तीमध्यें जर्मनींचे ७० हजार सैनिकांची हानी झाली.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

## पुणें शहर

**भांडवल :**

( ता. ३१-५-४४ रोजीं )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व खपलेलें | : | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें | : | रु. ५,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | : | रु. १,०८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | : | रु. ७५,००,००० चे वर |

—: डायरेक्टर्स :—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख

: शाखा :

पुणें ४, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... | रु. | १,२३,००,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रकाप्रमाणें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्युटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमजाई

## जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यावर रासायनिक क्रिया करून नव्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री द्यावी. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गाजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सरंक्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.

भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

## छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.

## ★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★

चिनाब, लाइमज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॅश, टोमॅटो सॉस, मॅंगो जॅम, मध; कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे स्टॉकिस्ट.

शाखा:—
माणिक चौक, अहमदनगर

★

हेड ऑफिस:—
पूना गेस्ट हाऊस, पुणें २

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, अॅक्चुअरी.

### महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.